## निशाणी ६४ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज हा विनोद गवाजी कुलकर्णी (भुसंपादन अर्ज क्र.२४२/२०१३ मधील जाबदार क्र.४) यांनी त्यांचे भारतीय स्टेट बँक, दशमेश नगर शाखा, छत्रपती संभाजीनगर मधील खाते क्र.२०१२८१९५६५४ अनफ्रिज करण्यासाठी केला आहे.

२. प्रस्तुत अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले.

३. अभिलेखानुसार या न्यायालयाच्या सहाय्यक अधिक्षकांनी सदर बँकेला १६.०७.२०२४ रोजी पत्र पाठवुन सदर खात्याबाबत स्थीतीची माहिती मागविली असता बँकेने त्यावर रु.६०,००,०००/– रक्कम होल्डवर असल्याचे नमुद करुन कळविले आहे. अर्जदाराचे वि. वकिल समक्ष उपस्थीत असुन त्यांचे म्हणणे असे की, सदर प्रकरणातील तडजोडीमध्ये त्यांना रु.७,६२,००५/– एवढीच रक्कम मिळालेली आहे. अभिलेखानुसार अन्य पक्षकारांना त्यांच्या रक्कमा आपापलया खात्यात मिळाल्या असल्याचे अहवाल या प्रकरणी दाखल झाल्याचे व त्याबाबत सदर बँकेकडे या न्यायालयाचे कार्यालयाद्वारा याच प्रकारचे कार्यवाहीसाठी पत्रव्यवहार (नि.१३, १५, १७, २०, २१, २६ ते ३३) झाल्याचे तपशिलवार दिसुन येते. अर्जदाराचे वि. वकिलांचे म्हणणे असे की, सदर बँक खाते पुर्वी फ्रिज करण्यात आले होते व नंतर त्याच खात्यात मावेजा रक्कम जमा झाल्यामुळे ती जमा करुनसुध्दा अर्जदार यांना प्रत्यक्षात मिळु शकलेली नाही.

४. माझ्या मते, सदर प्रकरणातील अभिलेख, मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे प्रस्तुत प्रकरणात मध्यस्थीद्वारे झालेल्या तडजोडीच्या समझोतानाम्याची प्रमाणित प्रत (नि.५५) व मध्यस्थी अहवाल यांचे एकत्रीत

अवलोकन केले असता सदर प्रकरण तडजोडीने मिटल्याचे दिसुन येते. तर उपरोक्त नमुद तपशिलानुसार अन्य पक्षकारांना मावेजा रक्कमा देण्याबाबत कार्यवाही झाल्याचे दिसुन येते. माझ्या मते, अशा परिस्थीतीत अर्जदार विनोद गवाजी कुलकर्णी यांना प्रस्तुत प्रकरणामध्ये मिळालेल्या मावेजा रक्कम रु.७,६२,००५/– रकमेपुर्ते सदर खाते अनफ्रिज करणे सदयस्थीतीत योग्य होईल. तसेच सदर बँकेकडुन प्रस्तुत खाते स्टेटमेंटची प्रत मागविणे योग्य होईल.

५. यास्तव, मी खालील आदेश पारीत करतो :

## <u>आदेश</u>

अ. अर्जदार विनोद गवाजी कुलकर्णी यांना प्रस्तुत प्रकरणामध्ये मिळालेल्या मावेजा रक्कम रु.७,६२,००५/– रकमेपुर्ते सदर खाते अनफ्रिज करणेत येते.

ब. सदर बँकेकडुन प्रस्तुत खात्याचे स्टेटमेंटची प्रत मागविणे योग्य होईल.

क. जर प्रस्तुत अर्जदार यांना पुर्ण खाते अनफ्रिज करुन घ्यावयाचे असेल आणि जर त्यात बँकेच्या अहवालाप्रमाणे रु.६०,००,०००/– किंवा तत्सम मोठी रक्कम जमा असेल तर या प्रकरणातील अन्य पक्षकारांना नोटीसा काढुन त्यांना त्यांचे काय म्हणणे असेल तर ते मांडण्याची संधी देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

Digitally signed by JADHAV KIRAN SAHEBRAO
Date: 2024.08.03 17:38:59 +0400

(के. एस. जाधव)

दि.०१/०८/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, औरंगाबाद

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.M. Shaikh |
| Name of the Court | : | Jt. CJSD Court, Aurangabad. |
| Order date | : | 01.08.2024 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 01.08.2024 |
| Order uploaded on | : | 01.08.2024 |